# नवी मुंबई महानगरपालिका

## जाहिरात क्रमांक आस्था/०२/२०२५, दिनांक : १३.१२.२०२५

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-'अ'मधील विविध संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर अटी-शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे ही सार्वजनिक आरोग्य सेवेतील आहेत. सदर भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होण्याकरिता जाहिरात देण्यात येत आहे. सदर जाहिरातीनुसार गट-'अ'मधील एकूण ११३ पदांकरिता अर्ज करण्याचा कालावधी **दिनांक ०५.०१.२०२६ पासून ते दिनांक ०४.०२.२०२६ रोजीपर्यंत** आहे. इच्छुक उमेदवारांनी **www.nmmc.gov.in** या संकेतस्थळावर **दिनांक** ०४.०२.२०२६ या दिवशी रात्री ११.५५ वाजेपर्यंत Online पद्धतीने अर्ज करावेत. प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | गट | संवर्ग | ७व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | | भरावयाची आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतनस्तर | वेतनश्रेणी | |
| १ | अ | वैद्यकशास्त्रतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | १६ |
| २ | अ | शल्य चिकित्सक | एस-२० | ५६१००-१७७५०० | १० |
| ३ | अ | स्त्रीरोगतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | २१ |
| ४ | अ | बालरोगतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | १७ |
| ५ | अ | क्ष किरणतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | ११ |
| ६ | अ | विकृतीशास्त्रतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०२ |
| ७ | अ | इन्टेन्सिव्हिस्ट | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०४ |
| ८ | अ | बधिरीकरणतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०५ |
| ९ | अ | अस्थिव्यंगतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०४ |
| १० | अ | त्वचारोगतज्ज्ञ | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०१ |
| ११ | अ | रक्त संक्रमण अधिकारी | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०१ |
| १२ | अ | मेडिकल रेकॉर्ड कीपर अधिकारी | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०१ |
| १३ | अ | वैद्यकीय अधिकारी (उरोरोग व क्षयरोगतज्ज्ञ) | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०२ |
| १४ | अ | कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी | एस-१६ | ४४९००-१४२४०० | १७ |
| १५ | अ | पशुवैद्यकीय अधिकारी | एस-२० | ५६१००-१७७५०० | ०१ |
| | | | | एकूण | ११३ पदे |

**ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाइन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरू होण्याचा दिनांक | दि. ०५.०१.२०२६ |
| २ | ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०४.०२.२०२६, वेळ रात्री ११.५५ पर्यंत |
| ३ | ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत | दि. ०४.०२.२०२६ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाइन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| ५ | ऑनलाइन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रात नमूद केल्यानुसार) | नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |

***परीक्षा शुल्क :**

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| खुला प्रवर्ग | मागासवर्गीय, अनाथ, दिव्यांग, आर्थिक दुर्बल घटक |
| ₹ १,०००/- | ₹ ९००/- |

***परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल.**

***संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध केली जाईल.**

ऑनलाइन अर्ज करण्याची पद्धत इत्यादींबाबतचा तपशील व ऑनलाइन अर्ज करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशील, वेतनश्रेणी, वयोमर्यादा/ वयोमर्यादा शिथिलता, निवड पद्धत, सर्वसाधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतुदी, पदनिहाय ऑनलाइन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादींबाबतचा तपशील **www.nmmc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल..

सही/-
**(डॉ. कैलास शिंदे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**स्थळ : सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**
**दिनांक :** १३.१२.२०२५.

Mahabharti.in
Protected with trial version of Visual Watermark. Full version doesn't put this mark.